पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
लेखा विभाग
क्र. लेखा/१/कावि/१२२४/२०१८
दिनांक :- २०/०४/२०१८

**विषय :-** ३१/३/२०१८ अखेरची महसुली/भांडवली बिले अदायगी बाबत.

**संदर्भ :-** परिपत्रक क्र. लेखा/१/कावि/३३२३/२०१८
दिनांक :- २७/०३/२०१८

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष ३१ मार्च २०१८ रोजी संपलेले असून उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार भांडवली व महसूली बिले दि.२८/३/२०१८ पर्यंत सादर करणेबाबत विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार लेखा विभागा कडे प्राप्त झालेली ३१ मार्च २०१८ पर्यंतची बिले तपासून काही बिले त्यावरील आक्षेप पूर्तते कामी संबधित विभागाकडे पाठविण्यात आली होती. अशा बिलांची अद्यापही पुर्तता होवून लेखा विभागात बिले प्राप्त झालेली नाहीत. तरी सदरची बिले आक्षेप पुर्ततेसह दि.२३/४/२०१८ पर्यंत लेखा विभागात सादर करण्यात यावीत. तद् नंतर सादर केलेली बिले लेखा विभाग स्विकारणार नाही. व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विभागप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रति,
सर्व संबधित विभागप्रमुख

Scanned by CamScanner